# डॉ आंबेडकर यांचे स्त्रियांच्या उन्नतीविषयी विचार व कार्य

**डॉ.राजश्री मनोहर बिसुरे** मराठी विभाग प्रमुख गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय कोल्हापूर

---

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील एक महान समाजसुधारक, तत्वज्ञ, कायदेपंडित, थोर शिक्षणतज्ज्ञ होते. भारतीय समाजात स्त्रीयांना मानवतेचे हक्क मिळवून देण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असे आहे. प्राचीन काळातील स्त्रीपुरूष समानतेचा पुरस्कार करणारे आणि स्त्री स्वतंत्र्याचे पहिले उद्धारक भगवान गौतम बुद्ध आणि एकोणिसाव्या शतकातील स्त्री शिक्षणाला अग्रक्रम देणारे द्रष्टे विचारवंत महात्मा फुले यांच्या विचारांनी प्रेरित होऊन स्त्रियांच्या उन्नतीविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर मूलगामी चिंतन केले. स्त्रीयांना सन्मानाने जगता यावे अशी व्यवस्था आपल्या विचारांच्या आणि कार्याच्या माध्यमातून केली. यासाठी सर्वप्रथम त्यांनी भारतीय स्त्रियांच्या अधोगतीची कारणे शोधली. स्त्रियांच्या अवनतीची कारणे त्यांना मनूप्रणीत समाजरचनेत सापडली. मनूने स्त्री जीवनासंबंधी जे धार्मिक कायदे करुन ठेवले होते त्यामुळे स्त्री समाजात अनेक बंधनांमध्ये जखडली गेली. विषमतेचे समर्थन करणाऱ्या भारतीय पुरुषसत्ताक समाज व्यवस्थेविरुद्ध डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी वैचारिक संघर्ष उभारला. प्रस्थापित समाज व्यवस्थेला बळी पडलेल्या स्त्रियांच्या उन्नतीचा मार्ग केवळ शिक्षणाने खुला होणार आहे हे त्यांनी ओळखले होते. यासाठी त्यांनी आपले प्रयत्न चालवले.

**उद्दिष्टे:**

१) डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्री उन्नती विषयक विचारांचे अध्ययन करणे.

२) स्त्री शिक्षणासंबंधी डॉ. आंबेडकरांच्या विचारांचे अध्ययन करणे.

**गृहितके:**

१) स्त्री उन्नती विषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सातत्याने प्रयत्न केले. स्त्रियांना कायदेशीर अधिकार मिळवून दिले.

२) स्त्रियांना समाजात समान दर्जा मिळवून देण्याकरिता डॉ. आंबेडकरांनी सातत्याने स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधाकरिता माहिती संकलित करण्याकरिता दुय्यम स्रोतांचा वापर केला आहे. संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

**स्त्रियांचे समाजातील स्थान:**

भारतीय समाज व्यवस्थेबाबत स्त्री पुरुष समानतेचे स्वप्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाहिले आणि ते सत्यात उतरविण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले.समाजाचा अर्धा घटक असणाऱ्या स्त्रीचा विकास झाल्याशिवाय समाजाचा, कुटुंबाचा विकास होणार नाही हे त्यांनी जाणले होते. २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड सत्याग्रहात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांना गुलाम बनवणारी संहिता 'मनुस्मृती' चे दहन केले. स्त्री स्वातंत्र्याच्या दृष्टीने ही एक क्रांतिकारक घटना आहे. "गौतम बुद्धांनी भारतीय स्त्रियांना गुलामगिरीतून मुक्त केले. त्यांच्या जीवनात क्रांती घडवून आणली. स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा तो पुरस्कर्ता होता. तर स्त्रियांच्या अवनतीस मनूच जबाबदार आहे"[१] असे प्रतिपादन त्यांनी केले. 'Rise and Fall of Hindu women ' या छोटेखानी ग्रंथातून त्यांनी या संस्कृतीने स्त्रियांवर कशी बंधने घातली, कसे हीन लेखले यांचे विवेचन केले.

**स्त्री शिक्षण :**

भारतातील सर्व जाती धर्मातील स्त्रियांची, स्त्रियांना गुलाम बनविणाऱ्या जाचक रूढी परंपरां मधून सुटका करावयाची असेल तर स्त्री शिकली पाहिजे, सक्षम बनली पाहिजे असा विचार करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री शिक्षणावर भर दिला. स्वाभिमान, स्वावलंबन आणि आत्मोध्दार शिक्षणामुळेच घडून येणार आहे, म्हणून शिक्षणाच्या बाबतीत स्त्रीयांनी मागे राहू नये, असे त्यांचे मत होते. माणूस म्हणून जगण्यासाठी शिक्षण हा एक महत्त्वपूर्ण मार्ग आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दि. २७ डिसेंबर १९२९ मध्ये महाड समता संग्रामावेळी स्त्रीयांना उद्देशून जे भाषण केले, त्यात स्त्री शिक्षणाचे महत्त्व सांगताना आपली पुढील पिढी जर तुम्हाला सुधारायची असेल तर आपल्या मुलींनाही शिक्षण दिले पाहिजे असा विचार व्यक्त केला. शिक्षण हे माणसाची गुलामी नष्ट करण्याचे व त्यांच्यात स्वतःची ओळख करून देण्याचे व सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे महत्त्वाचे साधन आहे हे बाबासाहेबांनी जाणले होते म्हणून त्यांनी स्त्री शिक्षणावर विशेष भर दिला उपेक्षित, असहाय स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाल्याखेरीज त्यांची स्वतःची व समाजाची उन्नती होणार नाही त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे शिक्षण हेच एक प्रभावी माध्यम आहे या भूमिकेतून बाबासाहेबांनी स्त्री शिक्षणाकडे पाहिले आहे. बाबासाहेबांची स्त्री शिक्षणाविषयक भूमिका तळमळीची आणि उदारमतवादी होती त्यामुळेच स्त्री शिक्षणाला चालना मिळत गेली. बाबासाहेबांनी ज्या अनेक परिषदा आयोजित केल्या त्यात जे ठराव मांडले गेले त्यातही स्त्री शिक्षणावर त्यांनी भर दिलेला दिसतो. बाबासाहेबांच्या शैक्षणिक सुधारणेचा वसा घेऊन अनेक स्त्रिया स्वतः शिकल्या आणि माता जाईबाई चौधरी सारख्या

स्त्रीने तर पुढे १९२४ साली मुलींची संत चोखामेळा शाळा काढून मुलींच्या आणि स्त्रियांच्या मध्ये शिक्षणाची जागृती निर्माण केली. शांताबाई दाणी यांनी प्रत्यक्ष राजकारणात भाग घेऊन बाबासाहेबांच्या स्त्री शिक्षण विषयक कार्याला गतिमान केले.

**डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री विषयक सामाजिक विचार :**

स्त्रियांच्या समाजातील स्थिती गतीचे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर मूलगामी चिंतन केले. स्त्री विषयक सामाजिक भूमिका मांडताना बाबासाहेब म्हणतात की आपल्या पतीचा मुलाबाळांचा कुटुंबाचा व कुळाचा नावलौकिक स्त्रियांच्या शिलावर अवलंबून आहे. स्त्रीने पतीची मैत्रीण बनून त्याच्या कार्यात सहकार्य द्यावे मात्र पतीने गुलामासारखे वागवल्यास खंबीरपणे त्याला नकार द्यावा व समतेसाठी आग्रह धरावा. स्त्रियांची प्रगती म्हणजे समाजाची प्रगती असे मोजमाप करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा स्त्री शक्तीवर फार मोठा विश्वास होता. स्त्रियांमध्ये असणाऱ्या सामर्थ्याची जाणीव बाबासाहेबांना झाली होती. स्त्रियांच्या प्रगतीवर अधिक भर दिला गेला पाहिजे यासाठी स्त्रियांच्या मानसिक स्वास्थ्याबरोबरच शारीरिक स्वास्थ्याचाही विचार डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी केलेला दिसून येतो. संतती नियमनाबाबत विचार मांडत असताना संतती नियमन हे स्त्री वर्गासाठी वरदान ठरेल असे त्यांचे ठाम मत होते. जास्त मुले जन्माला घालाव्या लागणाऱ्या स्त्रियांना त्या संकटातून मुक्त करून दिलासा देणाऱ्या संतती नियमनाचा पुरस्कार करण्यामागे बाबासाहेबांची स्त्रियांबद्दलची एक विशिष्ट दृष्टी दिसते. स्त्रियांच्या दुःखाकडे त्यांनी लक्ष दिले. लागोपाठ मुले होणे यामुळे अनेक स्त्रिया मृत्यूमुखी पडतात तर नको असलेली संतती टाळण्यासाठी अनेक स्त्रिया अघोरी पद्धतीने गर्भपात घडविण्याचा प्रयत्न करतात. असे करण्यामागे कुटुंब चालवणे ही त्यांची एक गरज असते "कोणत्याही कारणासाठी का होईना ज्यावेळी एखाद्या स्त्रीची मूल होऊ देण्याची इच्छा नसेल त्यावेळी तिला गर्भधारणाच टाळता येण्याची सोय असली पाहिजे आणि संतती जन्माला घालणे हे सर्वस्वी तिच्या इच्छेवरच अवलंबून असले पाहिजे"[२] असा एक मानवतावादी विचार डॉ बाबासाहेबांनी व्यक्त केला आहे. संतती जन्माला येत असताना स्त्रीला गरोदरपणाचा, बाळंतपणाचा आणि मुलांच्या संगोपनाचा भार सुद्धा वहावा लागत असल्याने त्याचा परिणाम तिच्या आरोग्यावर तर होतोच पण तिच्या ऐकूनच व्यक्तिमत्वावरही होत असतो हे बाबासाहेबांनी जाणले होते. म्हणून त्यांनी संतती नियमनाचा पुरस्कार केला. स्त्रियांच्या प्रगतीच्या आड त्यांची लवकर होणारी लग्न येतात हे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी बरोबर हेरले होते म्हणूनच लग्न लवकर करून वैवाहिक जीवन त्यांच्यावर लादू नका असे ते नेहमी सांगत असत. मुस्लिम स्त्रियांबद्दलही बाबासाहेबांनी चिंतन करून आपले विचार मांडले होते. " मुस्लिम स्त्रियात असणारी सक्तीची पडदा पद्धत अत्यंत वाईट रुढी असल्याचे मत ते नोंदवतात. सक्तीच्या पडदा पद्धतीमुळे मुस्लिम स्त्रिया समाजापासून एकाकी पडल्या. पडदा पद्धतीमुळे मुस्लिम स्त्रिया मानसिक व नैतिकदृष्ट्या खचल्या. एकांतवासामुळे त्यांच्या शारीरिक प्रकृतीवर वाईट परिणाम होऊन त्या अनेक रोगास बळी पडतात. त्यांचा दृष्टिकोन संकुचित व मर्यादित राहतो. न्यूनगंडाची भावना निर्माण होते भित्रेपणा वाढतो जीवनातील संघर्षाला ती समर्थपणे तोंड देऊ शकत नाही इत्यादी पडदा पद्धतीचे दुष्परिणाम त्यांनी नोंदवले आहेत." [३] मुस्लिम स्त्रियांच्या व्यथेचे सुक्ष्म चिंतन वरील विवेचनावरून लक्षात येते.

महाड समता परिषदेत खास स्त्रियांसाठी आयोजित करण्यात आलेल्या भाषणात डॉ. आंबेडकरांनी दलित स्त्रियांना लुगडी नेसण्याची पद्धत बदलावी, तसेच वरिष्ठ वर्गांच्या बायकांप्रमाणे लुगडी नेसावीत, गळयात गळसऱ्या व हातात कोपरभर कथलाचे किंवा चांदीचे गोठ पाटल्या न वापरण्याचे आवाहन केले. याच बरोबरीने स्वच्छतेने वागा असेही आवाहन केले. "तुमच्या साडीला ५० ठिगळे असली तरी चालतील पण ती स्वच्छ असले पाहिजे याची काळजी घ्या तुम्ही शिकलात तर पुष्कळच प्रगती साधेल असा स्त्रियांना त्यांचा संदेश आहे परिश्रमपूर्वक अभ्यास करून उच्च शिक्षण मिळवावे आणि या शिक्षणाच्या जोरावर वैयक्तिक सुख सोयीबरोबरच आपल्या समाजाला समृद्ध व सन्माननीय कसे बनविता येईल यावर त्यांचा भर होता. शिक्षणामुळे मनोविकास त्याचबरोबर चारित्र्याचा विकास व समाज स्वास्थ्यही साधले जावे." [४] असा त्यांचा कटाक्ष असलेला दिसतो. मुंबईतील पोयाबवाडी येथे देवदासी,जोगतिणी, मुरळ्या, पोतराज, वाघे, भुते अशा देवास वाहिलेल्या स्त्री-पुरुषांची एक सभा भरवण्यात आली होती. त्यावेळी बाबासाहेबांनी त्यांना देहविक्रय करून पोट भरणे सोडून दिले पाहिजे अशा पद्धतीचा उपदेश केला. स्त्रियांचा लौकिक हा तिच्या शिलावर अवलंबून असतो असे हे म्हटले. २० जुलै १९४२ रोजी नागपूर येथे आयोजित All India Depressed Classes Women's Conference मध्ये स्त्रियांना उद्देशून केलेल्या भाषणात स्त्रियांच्या प्रगती वरच समाजाची प्रगती अवलंबून आहे असे मत मांडून स्त्रियांनी आपल्या मुलांना शिक्षण दिले पाहिजे स्वच्छ राहण्यास शिकवले पाहिजे आणि सर्व दुर्गुणापासून दूर ठेवले पाहिजे अशा पद्धतीचे आवाहन केले.

१९२८ पासूनच पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांच्या सभा परिषदा भरवण्यावर बाबासाहेबांनी भर दिला त्यामुळेच पुढील काळात शांताबाई दाणी, सुलोचना डोंगरे, राधाबाई कांबळे यासारख्या दलित स्त्रियांचे नेतृत्व पुढे आले. नागपूर येथे आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली एक महिला परिषदही संपन्न झाली. कानपूर हैदराबाद येथेही त्यांनी महिला परिषदा घेतल्या. बाबासाहेबानी घेतलेल्या चर्चा परिसंवाद यांचा परिणाम असा झाला की स्त्रियांमध्ये क्रांती घडून आली स्त्रियांचे आचार विचार बदलू लागले मोठ्या संख्येने स्त्रिया सभा संमेलनांमध्ये भाग घेऊ लागल्या. स्त्रियांच्या सभेत केलेल्या भाषणात बाबासाहेबांचे

स्त्रियांविषयीचे असणारी तळमळ दिसते. ही भाषणे अत्यंत उद्बोधक व हृदयास भिडणारी अशी होती. त्यामुळे आंबेडकरांच्या विचाराने प्रभावित होऊन शेकडोंच्या संख्येने स्त्रिया चळवळीत आल्या. कोल्हापूर येथे नऊ महिला संस्थांच्यावतीने विमलाताई बागल यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी निंबाळकर यांच्या राजाराम थिएटर मध्ये डॉ आंबेडकरांचा सत्कार आयोजित केला होता, तेव्हा दलित स्त्रियांनी आपल्या हक्कासाठी पुढे आले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. जनता, मूकनायक, प्रबुद्ध भारत या पत्रांच्या माध्यमातून स्त्री प्रबोधनाचे फार मोठे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले. जनता या पत्राच्या कार्यकारिणीत श्रीमती सावित्रीबाई बोराडे व श्रीमती अबुबाई गायकवाड या दोन महिलांचा समावेश डॉ. बाबासाहेबांनी केला होता. अंजनाबाई देशभ्रतार यांनी जिद्द चिकाटी या गुणाच्या जोरावर पतीच्या सहकार्यावर नागपूर येथे अस्पृश्य मुलींसाठीचे वसतिगृह यशस्वीपणे चालविले.

१९४२ मध्ये मजूर मंत्री झाल्यानंतर बाबासाहेबांनी महिलांसाठी पगारी प्रसुती रजा विधेयक संमत करून घेतले. "८ फेब्रुवारी १९४४ रोजी केंद्रीय कायदे मंडळात कोळसाखान्यातील स्त्री कामगारांबद्दल आंबेडकरांनी चर्चा केली. कोळसा खाणीत काम करणाऱ्या मजुरांबाबत स्त्री पुरुष असा भेद सरकार करणार नाही स्त्री-पुरुषांना समान मजुरीतत्व प्रथमतः कोळसा खाणीतील कामगारांच्या बाबतीत स्वीकारले गेले कोळसाखान्यातील स्त्री कामगारांसाठी कुलपासह कपाटांनी युक्त अशी स्नानगृहे बांधण्याचे मालकावर कायदेशीर बंधन घालण्यासाठी बाबासाहेबांनी केंद्रीय विधिमंडळात बिल आणले व ते पास करून घेतले." [५] स्त्रियांच्या सर्वांगीण विकासचा इतका खोलवर विचार क्वचितच कुणी केला असेल. स्त्रियांच्या उन्नतीसाठी बाबासाहेबांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले.

**हिंदू कोड बिल व स्त्री मुक्ती :**

भारतीय स्त्रीला धर्माच्या पारंपारिक चालीरीती तसेच पुरुषत्वाच्या जोखडातून मुक्त करण्याचे कार्य बाबासाहेबांनी हिंदू कोड बिलाच्या रूपाने केले. यातून भारतीय स्त्री खऱ्या अर्थाने गुलामगिरीच्या बेड्यातून मुक्त झाली. भारत सरकारने सर बी. एन. राव यांच्या अध्यक्षतेखाली हिंदू लॉ कमिटी १९४१ मध्ये नेमली होती. या समितीने देशभर दौरे काढून नामवंत कायदेपंडित व विचारवंतांची मते विचारात घेऊन हिंदू संहिता विधेयक तयार केले. १९४६ पासून हे विधेयक मध्यवर्ती कायदेमंडळासमोर विचार विनिमयासाठी ठेवले जात होते. परंतु कोणत्या ना कोणत्या कारणासाठी पुनर्विचारासाठी ते परत पाठवले जाई. सनातने हिंदूंचा हिंदू कोड बिलाला तीव्र विरोध होता बाबासाहेबांनी हिंदू संहिता विधेयक तयार करताना सर्व स्मृतींचा व शास्त्रांचा अभ्यास केला होता. ५ जानेवारी १९५१ ला हिंदू संहिता विधेयक लोकसभेत मांडले गेले. तीन दिवस लोकसभेत या बिलावर चर्चा झाली.डॉ. बाबासाहेबांनी हिंदू कोड बिल सादर केल्यानंतर त्याला प्रतिगामी विचारसरणीच्या लोकांनी जोरदार विरोध केला. या बिलासाठी बाबासाहेबांना आपल्या कायदेमंत्री पदाचा राजीनामाही द्यावा लागला. मात्र पुढील काळात हिंदू कोड बिल विविध लहान बिलात स्वतंत्रपणे मंजूर झाले."१९५५-५६ साली संमत झालेले चार हिंदू कायदे म्हणजे कायद्याच्या इतिहासातील एक क्रांतिकारक घटना म्हटली पाहिजे." [६] यामधील १) हिंदू विवाह कायदा (१९५५), २) हिंदू वारसा हक्क कायदा (१९५६), ३) हिंदू अज्ञान पालकत्व कायदा (१९५६), ४) हिंदू दत्तक पोटगी कायदा (१९५८) या चार कायद्यांमुळे स्त्री जीवनात मोठी क्रांती घडून आली. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क मिळाले. बाबासाहेबानी हिंदू कोड बिलात आंतरजातीय विवाह, घटस्फोटाचा अधिकार, पोटगीचा अधिकार, वडीलांच्या संपत्तीत मुलाप्रमाणे मुलीलाही वारसाहक्क, मुल दत्तक घेण्याचा अधिकार स्वतःचा उत्तराधिकारी निश्चित करण्याचा अधिकार, एक पत्नीत्व यासारख्या तरतुदी केल्या. अनेक तऱ्हेचे मूलभूत अधिकार स्त्रियांना मिळवून देऊन संपूर्ण भारतीय स्त्रियांच्या विकासाचा, प्रगतीचा, उन्नतीचा मार्ग त्यांनी मोकळा करून दिला. हिंदू कोड बिल म्हणजे स्त्री स्वातंत्र्याचा जाहीरनामाच होता. हिंदू कोड बिलामुळे स्त्रियांच्या बाबतीत केल्या जाणाऱ्या अन्याय अत्याचाराला आळा बसला. अशा रीतीने भारतीय संविधान व हिंदू कोड बिलाद्वारे बाबासाहेबांनी भारतीय समाजातील स्त्रियांना दिलेली अनमोल देणगी आहे. डॉ बाबासाहेबांच्या अथक प्रयत्नामुळेच भारतीय स्त्री आज मुक्तीचा व सुटकेचा श्वास घेत आहे. स्त्रियांच्या अंधकारमय जीवनासाठी डॉ. बाबासाहेब हे खऱ्या अर्थाने दैदीप्यमान सूर्य ठरले. त्यांचे हे अलौकिक कार्य पाहता भारतीय स्त्रिया सदैव त्यांच्या ऋणात राहतील यात शंकाच नाही.

**निष्कर्ष:**

बाबासाहेबांची स्त्री विषयक दृष्टी अत्यंत व्यापक स्वरूपाची होती. वर्षानुवर्षापासून धर्म रूढी परंपरेच्या विळख्यात सापडलेल्या स्त्रीला तिचा अधिकार मिळवून द्यायचा असेल, समाजात पुरुषाच्या बरोबरीचे स्थान मिळवावयाचे असेल तर स्त्रीची शैक्षणिक सामाजिक आर्थिक सांस्कृतिक उन्नती होणे गरजेचे आहे, हे त्यांनी जाणले होते. यासाठी भारतीय कायद्यात तशी तरतूद असणं आवश्यक आहे हे लक्षात घेऊन बाबासाहेबांनी कायद्यामध्ये स्त्रियांसाठी तशा तरतुदी करून ठेवल्या. स्त्रियांना कायदेशीर अधिकार मिळवून दिले. स्त्री शिक्षणातूनच भारतीय स्त्रियांची प्रगती होईल, पर्यायाने त्यांची उन्नती होईल हे त्यांच्या विचारातून स्पष्ट झाले आहे. भारतीय समाजातील स्त्रियांना डॉ. बाबासाहेब आणि संविधानाच्या कायद्याद्वारे महत्त्वाचे अधिकार प्राप्त करून दिले.

**संदर्भ :**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्र आ १९९३ पृष्ठ ४० १

२. तत्रैव. पृष्ठ ११७

३.आंबेडकरी चळवळीचा इतिहास, डॉ एस. एस. गठाळ, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद २०१९ पृष्ठ४०६

४. . डॉ बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, संपादक प्राचार्य टी ए गवळी, प्रकरण पाच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील शेवटचे दिवस, डॉ बाबुराव गायकवाड पृष्ठ ७१-७२

५. आंबेडकरी चळवळीचा इतिहास, डॉ एस. एस. गठाळ, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद २०१९ पृष्ठ२३८.

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्र आ १९९३ पृष्ठ२६६